# रसराज जगन्नाथ



बाबुलनाथ

REFBK-0011261
REFBK-0011261

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७८३
१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८९४८ वि. काव्य
क्रमांक ७४९३ नों. दि: ८-१-६१

# रसराज जगन्नाथ

बाबुलनाथ

REFBK-0011261
REFBK-0011261

क्र. क्र. ११२६१

कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणें २

प्रकाशक
अ. अं. कुलकर्णी
कॉण्टिनेण्टल प्रकाशन
टिळक रस्ता, पुणें २

सर्व हक्क कवीचे अधीन

किंमत : दोन रुपये

मुखपृष्ठावरील व आंतील चित्रें :
चित्रकार – श्री. पाथरकर

प्रथमावृत्ति १९६०

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पुणें २



माझी मानसकन्या

**नंदिनी घोटीकर**

हिच्या

पवित्र स्मृतीस

# ‘लोकाधिक पण्डितराजराजतिलक’

पंडितराज जगन्नाथ याची साहित्यशास्त्रीय रचना ही पराकाष्ठेच्या विद्वत्तेने नटलेली आहे; त्याची काव्यरचना ही विदग्धतेने ओथंबलेली अशी मानिली जाते; आणि त्याचें वैवाहिक जीवन लोकाधिक, लोकविलक्षण व समृद्ध असल्याकारणाने कुतूहलाचा विषय होऊन राहिलें आहे. विद्या, संपत्ति, प्रतिष्ठा आणि यशस्विता या चौघींनीहि त्याला वरिल्याकारणाने त्याच्या भावजीवनांत आणि काव्योद्यानांत एक प्रकारचें कृतार्थतेचें वातावरण जसें भरून राहिलें आहे, त्याचप्रमाणे त्यांत ज्ञानाचा फुंजहि पसरलेला आहे. कांही स्थळीं अपशब्दांचा खकाणा आहे. तथापि त्याच्या ठायीं असलेल्या विद्वत्तेचा दर्जा अत्यंत उच्च आहे, यांतहि संशय नाही. त्याला झालेली संपत्तीची प्राप्ति ही उचित वाटते; त्याची प्रतिष्ठा आणि त्याचें यश हींहि यथास्थान वाटतात. या सर्व वैभवामुळे संस्कृत वाङ्मयाच्या प्रदीर्घ इतिहासपरंपरेंत जगन्नाथ हा शेवटचा देदीप्यमान तेजोगोल समजला जातो. संस्कृताप्रमाणे फारसी भाषेवरहि त्याचें प्रभुत्व होतें. त्यामुळे त्याच्या विद्वत्तेला विलोभनीय अनेकपदरीपणा आलेला आहे. परंतु या सर्वांत त्याच्या कलंदर ‘लोकाधिक’ जीवनाने त्याच्या विद्येला, त्याच्या भक्तियोगाला, त्याच्या ऐश्वर्याला आणि त्याच्या ऐहिक यशाला कांही वेगळीच झळाळ दिली आहे.

जगन्नाथपंडिताच्या जीवनाविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत*. परंतु त्यांच्या सत्यासत्यतेची परीक्षा करणें हें कठीण आहे. एखादी दंतकथा केवळ सातत्याने आणि जिवटपणाने प्रचलित आहे, एवढ्यावरून तिचा अस्सलपणा गृहीत करितां येत नाही हें खरें, परंतु विशिष्टच कवीच्या बाबतींत एखादी वेगळ्या प्रकारची दंतकथा रूढ व्हावी, याला तसें कांही

* पहा : दत्तात्रेय गोविंद पाध्ये यांनी संपादिलेल्या ‘गङ्गालहरी’चा उपोद्घात.

कारण असावें, असें अनुमान अयथार्थ ठरणार नाही; आणि मग त्या दंतकथेचा ऐनजिनसी गाभा खरा मानण्याकडे कल होतो. प्रत्येक ऐतिहासिक घटनेला अस्सल पुराव्याची मागणी करूं जाणें हें अतिरिक्तपणाचें आहे. असा इतिहास हा पुष्कळदा शब्द सोडलेल्या धड्याप्रमाणे, किंवा अक्षरें नीट न लागणाऱ्या दस्तऐवजाप्रमाणे वाचावा लागतो. जगन्नाथपंडिताचा दिल्लीपति मोगलांच्या दरबाराचा आश्रय, उत्तरकालीन मोगलांचें विलासी जीवन, जगन्नाथाची अतुल बुद्धिमत्ता, त्याची भ्रमंती, त्याच्या काव्यांतील विविधरंगी निर्देश यांमुळे जगन्नाथ आणि त्याची प्रणयिनी लवंगी यांचें प्रणयप्रकरण हें ऐतिहासिकच वाटावें, इतकें तें अध्याहृत पण सत्याधार वाटतें.

आंध्रप्रदेशाची कूस ही विद्वानांची प्रसवित्री असा प्राचीन काळचा तिचा लौकिक. हा लौकिक जगन्नाथाच्या बाबतींत सर्वस्वीं यथार्थ ठरला. जगन्नाथ हा आंध्रदेशांतील वेंगिनाडु विभागाचा. त्याचे वडील महाविद्वान् असून त्यांचें नांव पेरु( रम )भट्ट असें होतें*. आईचें नांव लक्ष्मी. जगन्नाथ हा कौण्डिन्यगोत्री असून ऋग्वेदान्तर्गत आश्वलायन शाखेचा ब्राम्हण होता. आपल्या पित्याचा त्याने 'महागुरु' असा निर्देश केला आहे. या 'महागुरु' पेरुभट्टाने आपलें वेदान्ताचें समग्र अध्ययन गुरु ज्ञानेन्द्रभिक्षु याजपाशी, न्यायवैशेषिक दर्शनांचें अध्ययन महेन्द्र याच्या जवळ, जैमिनीय दर्शनाचा अभ्यास काशीमध्ये खण्डदेवापाशी आणि पातंजल महाभाष्याचें अध्ययन शेषश्रीकृष्णापाशी केलें. ही माहिती स्वतः जगन्नाथानेच 'रसगंगाधरा'च्या प्रास्ताविक श्लोकांत दिलेली आहे. अर्थात् जगन्नाथ हा ज्ञाननिधीचा साक्षात् वारसदार होता. त्याच्या कलंदरपणाच्या वर्तनाबद्दल त्याला समाजामधून बहिष्कृत व्हावें लागलें, ही दंतकथा खरी आहे असें मानिलें, तरी त्याच्या अंगभूत विद्वत्तेचें, पांडित्याचें त्याच्या हयातींतच खूप चीज झालें, हें त्याला मिळालेल्या अनाहूत विविध आश्रयांवरून स्पष्ट आहे. आपण दिल्लीपति मोंगलांचे आश्रित असल्याचा त्याने स्वतःच

* मात्र जगन्नाथाचा नातू म्हणविणाऱ्या कोणा महादेव दीक्षिताने 'भामिनीविलासा'वरील आपल्या टीकेंत जगन्नाथाच्या वडिलांचें नांव आवर्जून 'जागेश्वर सूरि' असें दिलेलें आहे.

अनेकदा निर्देश केलेला आहे. अकबराचा मुलगा जहांगीर (राज्य : १६०५–१६२७), त्याचा पुत्र शहाजहान (राज्य : १६२८–१६५८), १६४१-मध्ये मृत्यु पावलेला खानखानान आसफखान हा नूरजहानचा भाऊ, उदयपूरचा राणा जगत्सिंह (राज्य : १६२८–१६५९) कामरूपाधिपति प्राणनारायण (राज्य : १६३३–१६६६) यांचे जगन्नाथाच्या रचनांमध्ये निःसंदिग्ध उल्लेख आढळतात. आसफखानाविषयी त्याने 'आसफविलास' ही स्वतंत्र रचनाच केली आहे. जहांगीर व शहाजहान या दोघांच्याहि आस्थिर आणि वैभवशाली राजवटी त्याने जवळून पाहिलेल्या असल्या पाहिजेत. अकबराचीहि राजवट त्याला कदाचित् दुरून पण निःसंशय ज्ञात असावी. जगन्नाथ हा ब्राम्हण आणि मोगल राजे हे इस्लामधर्मी. पण अकबराच्या धर्मोदारतेने जगन्नाथाच्या मनांत मोगलांच्या आश्रयाविषयी विश्वास उत्पन्न केला असावा. या विश्वासानुरूपच पुढे घटना घडल्या, ही समाधानाची गोष्ट होय. शहाजहानापासूनच आपल्याला 'पंडितराज' आणि 'पंडितराजराजतिलक' या पदव्यांचा लाभ झाला असल्याचें त्याने 'आसफविलासां'त लिहून ठेविलेलें आहे. यांव्यतिरिक्त त्याने ज्या अनेक समकालीन श्रेष्ठ विद्वानांवर टीका केलेल्या आहेत, हल्ले केलेले आहेत, क्वचित् अपशब्दहि योजिलेले आहेत, त्यांत कालदृष्ट्या अप्पय दीक्षित (१५२० अथवा १५२३–१५९३ अथवा १६२६) आणि भट्टोजि दीक्षित हे प्रमुख होत. जगन्नाथपंडिताच्या जीवनक्रमाबद्दल उस्मानिया विद्यापीठाचे संस्कृत-विभागाध्यक्ष श्री. आर्येन्द्रशर्मा यांनी अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या आपल्या ग्रंथांत जीं संगतवार अनुमानें केलीं आहेत, तीं यथायोग्य वाटतात.

जगन्नाथ हा कालक्रमाने जहांगीर, जगत्सिंह, शहाजहान आणि प्राणनारायण यांच्या दरबारीं होता. १६२८ सालीं जहांगिराच्या नंतर शहाजहान राजपदीं आल्यावर आग्र्यास दरबारांत जी अस्थिरतेची लाट आली, तिच्या काळांत तो उदयपूरला जगत्सिंहाच्या आश्रयाला आला असावा. त्यानंतर बहुधा खुद्द दिल्लीपति शहाजहानाच्या निमंत्रणावरून तो पुन्हा दिल्लीस आश्रयार्थ गेला. १६५८-मध्ये शहाजहानाचा मृत्यु होईपर्यंत तो तेथेच होता. अर्थात् शहाजहानाच्या पदरीं त्याने सर्वाधिक काळ काढिला. तो काळ पंडितराजाच्या अव्वल ग्रंथरचनेचा, ऐश्वर्यांचा, यशाचा, वाङ्मयनिर्मितीचा,

उत्कर्षाचा आणि कुटुंबसौख्याचा होता, यांत संशय नाही. शहाजहानाच्या मृत्यूनंतर १६५८-मध्ये तो आसामच्या प्राणनारायणाच्या आश्रयाला गेला. इतका परिपक्व बुद्धीचा आणि कीर्तिमंत असा स्वाभिमानी संस्कृतज्ञ पंडित आसामसारख्या दूरदेशीं निमंत्रणावाचून जाईल, हें संभवत नाही. परंतु दुर्दैव असें की, एका वर्षाच्याच अवधींत, म्हणजे १६५९ सालीं खुद्द प्राणनारायणालाच आपल्या राज्यांतून पलायन करून शेजारच्या भूतान देशामध्ये आश्रयार्थ जावें लागलें. अर्थातच जगन्नाथाचा आसाममधला निवास हा अल्पकालीन ठरला. बहुधा त्यानंतर तो वाराणसीमध्ये आला असावा, आणि तेथेच विद्याध्ययन, अध्यापन, शिष्यनिष्पादन, भगवच्चिंतन, भगवद्भक्ति यांत त्याने आपलें उरलेलें आयुष्य शांत वृत्तीने घालविलें असावें.

जगन्नाथाचे वडील पेरुभट्ट यांच्या अध्ययनाचा थोडा पूर्वकाल स्मरहर-नगरांत म्हणजे वाराणसींत गेला, हें सांगितलेंच. त्या वेळीं बाल-जगन्नाथाने काशीचें पवित्र वातावरण आणि तेथल्या विद्यापीठांचा उत्कर्ष वडिलांच्या समवेत आपल्या संस्कारक्षम आयुष्यांत पाहिलेला असला पाहिजे. वडिलांच्या सहवासांतल्या लहानपणींच्या स्मृतींचा सुगंध त्याच्या विद्यालोलुप मनांत सतत दरवळत असला पाहिजे. अर्थात् काव्यात्म, भावपूर्ण आणि विद्यावन्त जगन्नाथाने आपल्या हयातीचा अंतिम काळ काशीसारख्या पवित्र क्षेत्रांत अमरतटिनीतीरीं समाधानाने घालविलेला असणें अगदी शक्य आहे.

जगन्नाथाचा जन्मकाल आणि निर्याणकाल या दोहोंचीहि आपणांला पुराव्याने माहिती नाही. मात्र त्याला दीर्घ आयुष्य लाभलें, अशी जी एक दृढ परंपरा आहे, तदनुसार पाहतां साधारणपणें इ. स. १५९० ते १६७० हा त्याचा जीवितावधि असावा, असें श्री. आर्येन्द्रशर्मा यांचें अनुमान आहे.

जगन्नाथाची ग्रंथरचना अत्यंत विपुल म्हणतां येण्यासारखी नसली, तरी ती पुष्कळच आहे. 'गंगालहरी', 'अमृतलहरी', 'करुणालहरी', 'लक्ष्मी-लहरी' आणि 'सुधालहरी' ही त्याची रचना आरंभकालांतली असावी. 'रसगंगाधर', 'आसफविलास' आणि 'चित्रमीमांसाखंडन' हे ग्रंथ त्याने मोगलदरबारीं असतांना रचिले. 'प्राणाभरण' हा ग्रंथ त्याने आसामांत प्राणनारायणाच्या पदरीं असतांना रचिला असावा, आणि 'भामिनी-

विलासा'दि रचना त्याने आपल्या आयुष्याच्या अखेरीस केली असावी.

जगन्नाथाच्या जीवनांतलें सर्वांत गाजलेलें आणि कलंदरपणाचें असें प्रकरण म्हणजे त्याचा मोगल-दरबारचा प्रेमविलास. 'भामिनी-विलासां'त एके ठिकाणीं त्याने 'सर्वं पण्डितराजराजतिलकेनाकारि लोकाधिकम्' असें म्हटलें आहे. 'लोकाधिकम्' हें पद तेथे साभिप्राय वाटतें. त्याचा 'लवंगी'-प्रकरणाशीं कोणीं संबंध जोडिला, तर तें अयोग्य तर ठरणार नाही, पण रूढ परंपरेशीं व जगन्नाथाच्या मोगलदरबाराशीं आलेल्या संबंधाशीं सुसंगतच ठरेल. अकबराची* 'लवंगी' नांवाची एक मुलगी (ती दासीकन्या असेल काय?) होती. तिचेंच नांव 'भामिनी' असावें, आणि तिलाच अनुलक्षून 'भामिनीविलासा'ची रचना त्याने केली असावी. 'भामिनीविलासा'वरून असेंहि अनुमान करितां येतें की, भामिनीचा सहवास जगन्नाथाला जीवनांत दीर्घकाल लाभला नाही. जगन्नाथाचा मुलगाहि भामिनीपाठोपाठ गेला. भामिनीविलासाची रचना जगन्नाथाच्या उत्तरायुष्यांत झालेली असल्याकारणाने या दुःखदायक घटना जगन्नाथाच्या उत्तरवयांत अथवा वार्धक्यांत घडल्या असाव्या. आपल्या वयास अनुसरून त्याने सरतेशेवटीं संन्यासाश्रमाची दीक्षा घेतली, अशीहि एक परंपरा आहे. जगन्नाथाच्या काशीनिवासाचें याने एक प्रकारें समर्थनच होतें. असेंहि असेल की, या विलासी, अभिमानी, विद्यावंत पंडितराजाने आपल्या जीवनाचें विकसित कमलपुष्प सरतेशेवटीं एके दिवशीं गंगामैयाला समर्पून टाकिलें! 'गंगालहरी'च्या एकेका श्लोकासरशी गंगेचें जल घाटाची एकेक पायरी चढत-चढत जाऊन त्याने बावन्नाव्या श्लोकाच्या समाप्तीस पंडितराजाला आपल्या उदरांत घेतलें, ही परंपरा या वरील अर्थानेच यथार्थ मानणें योग्य ठरेल.

* * *

आजवर आपल्या विनोदपूर्ण कवितांनी (आणि चमत्कारिक नांवाने) मराठीच्या वाचकांना परिचित असलेल्या श्री. बाबुलनाथांना जगन्नाथ-

---

* कोणाच्या मतें शहाजहानाची.

पंडिताच्या बहुरंगी जीवनपटाने आता आकर्षून घेतलें आहे. पहिल्या बाजीरावाच्या झंझावाती शौर्याला आणि समाजबंधनांत निगडित झालेल्या व्यक्तित्वाला ज्याप्रमाणे मस्तानीची कलंदर किनार लाभली, त्याप्रमाणे जगन्नाथाच्या महान् विद्यापराक्रमाला आणि समाजपंजरांतून सुटूं पाहणाऱ्या आकांक्षेला लवंगी या यवनकन्यकेची जरतारी झालर मिळालेली आहे. लवंगीचा प्रणय हा जगन्नाथाच्या जीवनांतील स्थायिभाव नसला, तरी ती त्यांतील एक महत्त्वाची घटना आहे; आणि तो या लघुकाव्याचा मध्यवर्ती विषय आहे. ज्या उभारीने, ऐटीने आणि विश्वासाने जगन्नाथाने विद्याक्षेत्रांत आपली तलवार गाजविली, तिचा भरघोस चित्रमय साक्षात्कार जरी प्रस्तुतच्या लघु-काव्यांत होत नसला, तरी त्याची जाणीव कवीला आहे असें दिसतें. श्री. बाबुलनाथांनी जगन्नाथाचें प्रेमजीवन आणि लवंगीचें प्रणयप्रकरण रूढ दंत-कथेला अनुसरून ठीक चित्रिलेलें आहे, तेंच त्यांना प्रस्तुत काव्याला आवश्यक आणि उपपन्न वाटलें. तें वाचीत असतांना एवढें मात्र वाटतें की, जगन्नाथाची विविध दरबारांतील भ्रमंती, त्याची अनुभवांची संपन्नता, त्याच्या निरनिराळ्या काव्यरचनांचें मर्म, त्याचीं अनेकविध सुखदुःखें, त्याचा पुत्रशोक, भार्याशोक, अंतिम काशीनिवास, तेथल्या पवित्र वातावरणांतला एकलेपणा इत्यादिकांच्या रसार्द्र चित्रणांनी प्रस्तुत काव्याचें आकर्षण निःसंशय वाढलें असतें, — खरें म्हणजे काव्यांतील जगन्नाथाचें व्यक्तित्वच पोसलें असतें; त्याला एक चौरसपणा आणि अनेकपदरीपणा आला असता. आहे या स्थितींत जगन्नाथाचें व्यक्तित्व कांहीसें एकेरी वाटतें, थिटें वाटतें. जगन्नाथाची निसर्गदर्शनाची जन्मजात ओढ दर्शविण्यांत कवीने मार्मिकता प्रकट केली आहे. तिचा अधिक गुणवत्तेने पाठपुरावा केला असता, तर त्याचें काव्यजीवन कसें बहरलें, तें पटण्याला साहाय्यहि झालें असतें. शहाजहानाच्या दरबारांतील जगन्नाथाचा वादविजय हाहि त्याच्या प्रकृतिधर्मांशीं सुसंगत असाच आहे. परंतु त्याचाहि विद्याक्षेत्रांतील अधिक अनुसार त्याच्या व्यक्तित्वाला पोषकच ठरला असता, असें वाटतें. अर्थात् काय गाळावें आणि घेतलेलें किती पोसावें, या विषयांत कवीचें स्वातंत्र्य निरंकुश असतें. जगन्नाथाचें जीवन रेखाटतांना त्याचें व्यक्तिदर्शन हें प्रधान कीं घटनाकथन हें प्रधान, याची शहानिशा महत्त्वाची होय. जीवनांतील

वर्णनीय अशी प्रत्येक घटना शेवटीं कलाकृतींत उण्यापुऱ्या रितीने व्यक्तिदर्शनच घडवितें. या दृष्टीने पाहतां, जगन्नाथ हा कांही नुसताच प्रेमिक नव्हता. तो गंगेचा भक्तहि होता. आणि प्रस्तुत काव्याच्या अखेरीस तसा त्याचा आविष्कारहि झालेला आहे. पण जगन्नाथाच्या जीवनाला याहि व्यतिरिक्त अनेक पैलू होते. आणि त्या सर्व पैलूंमधून एकदम दिसणारे त्याच्या जीवनाचे – काचेच्या लोलकयुक्त झुंबरामधून दिसावे त्याप्रमाणे – असलेले रंग वैशिष्ट्यपूर्ण होते. त्यांतले कांही रंग रेखण्याचा येथे कवीने यत्न केला आहे. कवि म्हणून जगन्नाथाचा दर्जा काय, हा ज्याच्या-त्याच्या रुचीचा आणि काव्यविषयक भूमिकेचा प्रश्न आहे. परंतु तो मोठा होता, असें मानण्याचें कारण नाही. निदान विद्वत्तेच्या क्षेत्रांतील त्याच्या दर्ज्याइतका उंच तो खचीतच नाही. जगन्नाथाच्या छोट्याशा जीवनिकेवर आधारलेल्या या काव्यांत अशा या चिकित्सेचा तादृश उपयोग कसाहि असो, त्याचें काव्यजीवन, भावजीवन, विद्यादर्प, कलंदरपणा, भक्तियोग या सर्वांचें रसायन जगन्नाथपंडितांत एकवटलेलें होतें. यांतील कांही पैलूंचें दर्शन जरी वाचकांना प्रस्तुत लघुकाव्यांत झालें, तरी तेवढ्याने कवीचे परिश्रम सफल होतील. समुद्रप्रवासाची तहान लहानशा सहलींतल्या छोट्या समुद्र-सफरीने भागवावी, तसेंच हें आहे.

ता. ५-११-६०　　　　　　अ र विं द  मं ग रू ळ क र

# निवेदन

पंडितराज जगन्नाथाच्या अलौकिक रमणीय चरित्राने व संस्कृत भाषेतील त्याच्या अमर काव्य-कलाकृतींनी माझ्या मनाला विद्यार्थिदशेपासून विलक्षण मोहिनी पडलेली आहे. त्याचें नितांतसुंदर जीवनचरित्र या छोट्याशा काव्यांत रेखाटण्याचा मीं शक्त्यनुसार प्रयत्न केलेला आहे. पंडितराज जगन्नाथाचें चरित्र आतापर्यंत गद्यस्वरूपांत अनेक लेखकांनी लिहिलें आहे व त्याच्या पद्य-गद्य वाङ्मयावर कितीतरी विद्वानांचे लेख मराठींतून आणि इंग्रजींतून प्रसिद्ध झालेले वाचावयास मिळतात. त्याच्या ‘ गंगालहरी ’ या नांवाजलेल्या काव्याचा अनुवाद वामनपंडितांपासून तों श्री. रा. का. ओक, श्री. रा. मा. भांबुरकर, श्री. ल. गो. विंझे इ. कवींनी केलेला आहे. त्याच्या जीवनचरित्रांत एक प्रकारचें अद्भुत व आकर्षक सौंदर्य असल्याकारणाने त्यावर कादंबरी व नाटक यांचाहि साज चढलेला दिसतो. मात्र त्याचें जीवनचरित्र मराठी काव्यामध्ये रंगविलेलें अजून तरी माझ्या पाहण्यांत आलेलें नाही. त्या दृष्टीने हा प्रयत्न आहे.

पंडितराज जगन्नाथाच्या चरित्राबाबत अद्यापि कांही अनिश्चितता आहे. त्याच्या चरित्राची ऐतिहासिक अगर विश्वसनीय माहिती अजून ठामपणें ठरावयाची आहे. त्याच्याबद्दल ज्या अनेक आख्यायिका व दंतकथा प्रचलित आहेत, त्यांचाच आधार घेऊन अनेकांनी त्याचीं चरित्रें लिहिलीं आहेत. अशा अद्वितीय ऐतिहासिक पुरुषाचें व सुप्रसिद्ध संस्कृतज्ञ कविराजाचें चरित्र काव्यांत चितारतांना मींहि काव्यास अनुकूल अशा ज्या त्याच्या जीवनांतल्या प्रमुख घटना, दंतकथा व आख्यायिका प्रसिद्ध आहेत त्यांचा उपयोग करून घेतलेला आहे. या काव्यासाठी जे संदर्भग्रंथ उपयोगी पडले, त्यांची व पंडितराज जगन्नाथाच्या उपलब्ध असलेल्या सर्व ग्रंथांची यादी रसिकांच्या माहितीसाठी म्हणून शेवटीं जोडिली आहे.

सदर काव्य रचून झाल्यावर तें मीं महाराष्ट्रकवि श्री. यशवन्त, श्री. चिं. वि. जोशी, श्री. वामनराव परांजपे, प्रा. वा. भा. पाठक,

श्री. दत्त रघुनाथ कवठेकर, श्री. गो. ल. आपटे व श्री. वि. त्र्यं. शेटे या माझ्या साहित्यिक मित्रमंडळींना वाचावयास दिलें व कांहींना तें प्रत्यक्ष ऐकविलें. त्यांनी दिलेल्या आपुलिकीच्या प्रोत्साहनाबद्दल व गोड सूचनांबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहें.

प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी वेळांत वेळ काढून या छोट्याशा काव्याला जी विवेचक प्रस्तावना लिहून दिली, तीबद्दल त्यांचे आभार मीं कोणत्या शब्दांनी मानावे, तें समजत नाही.

कालमानाप्रमाणे पुस्तकाची सजावटहि सर्वांगसुंदर करावयास पाहिजे, ही माझी पहिल्यापासून कलात्मक दृष्टि आहे. तदनुसार या पुस्तकास जीं अनुरूप चित्रें सुप्रसिद्ध चित्रकार श्री. पाथरकर यांनी माझ्या कल्पनेप्रमाणे व तसेंच माझे मित्र नाट्यतपस्वी श्री. बाबुराव विजापुरे यांच्याहि इच्छेनुसार काढून दिलीं, त्यांबद्दल त्यांचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच.

आनंद मुद्रणालयाचे मालक माझे मित्र श्री. य. गो. जोशी यांनी हें पुस्तक सुबक तऱ्हेने छापून दिल्याबद्दल, तसेंच 'कलाभुवना'च्या चालकांनी सर्व चित्रांचे ठसे सुंदर तयार करून दिल्याबद्दल आणि मित्रवर्य श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी विशेष लक्ष घालून तें आपल्या कॉण्टिनेण्टल प्रकाशनामार्फत प्रसिद्ध केल्याबद्दल त्या सर्वांना धन्यवाद देऊन ही काव्यकलाकृति मी रसिकांस प्रेमादराने सादर करीत आहें.

'शाम-सदन'<br>
६०, सोमवार पेठ<br>
पुणें २

बाबुलनाथ

# रसराज जगन्नाथ





सतराव्या शतकांत उगवला तारा हा कुठला
साहित्याकाशांत चमकुनी खळकन् कां तुटला ?

दाक्षिणात्य तो महान पंडित गोदाकांठीचा
भक्त शिवाचा आणिक तैसा साक्षात् विष्णूचा !

'जगन्नाथ' हें नाम जयांला बालपणीं लाभे
प्रकांडपंडित, वेदाध्ययनी त्यांस पिता शोभे !

बालपणीं त्यां भूल पाडली रम्य निसर्गानें
जातिवंत तो कवी जन्मला, देवाचें देणें !

वृक्ष, सरोवर, नदी, कमल, आकाश, गिरी, मेघ
भ्रमरतती, मृगनयना यांच्या संगतींत दंग !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२६९

विश्वाच्या कुरुपतेंतही त्यां सुंदरता दिसली
तत्काव्याची अलोट गंगा दुथडीनें भरली !

लाभुनि गुरुजी पिता स्वतःचा शिक्षण हो त्याचें
वेदांताचें–व्याकरणाचें–नीतीशास्त्राचें !

'लक्ष्मी' माता प्रेमळ त्याची चिंता पण तिजला
विवाह करुनी लागणार कधिं हा संसाराला ?

ब्रह्मांडाचा घांस घ्यायची भूक, तृषा तैशी–
विश्वांतिल सौंदर्य पिण्याची आतुरता त्यांसी !

विवाहवेदीवरीं न चढतां ठरला निर्धार
उत्तर भारत पहावयाचा करून संचार !

हिमालयाची बर्फाच्छादित गिरिशिखरें, रानें
पयस्विनी गंगेस भेटण्या भ्रमिष्ट खास बने !

कालिदास कविरायाचा तो मेघाचा मार्ग
धुंडाळावा गमे तयां जो पृथ्वींतिल स्वर्ग !

पंख फुटुनि हा उडून जाइल विहग जगन्नाथ
हाय ! केधवां, कुणांस त्याचा न लागला अंत !

चंद्रकलेसम वाढुनि त्याचें बुद्धीचें तेज
तिनुवेल्लीच्या सभेंत त्याचें अंकुरलें बीज !

शिव-विष्णुमधिं श्रेष्ठ कोणता देव असे त्याचा–
पंडितांत तो वाद माजला फार कडाक्याचा !

सर्व शक्तिमान् चैतन्याच्या एका रूपाला
कवटाळुनि हे पंडित देती दूषण दुसऱ्याला !

परमात्म्याच्या रूपाविषयीं ज्ञान न प्रत्यक्ष
पोकळ पांडित्यानें वेधिल कोणाचें लक्ष ?

नानाविध रूपांनीं नटला परमात्मा पूर्ण
शिव-विष्णू हे दोन्ही एकच; रूपें जरि भिन्न !

विद्वत्तेनें गर्जुन ऐसें समरसभेमाजीं
जगन्नाथ हा विजयी झाला ठरून रणगाजी !





विद्वत्तेनें जरी घातली जरतारी शाल
हृदयांतिल पण आग न विझतां उफाळला जाळ!

गृहत्याग हा करून जावें लांब कुठें दूर
मोहपाश हा नको कशाचा, असार संसार!

बंधनांतलें जीवन म्हणजे कारागार खरें
मिळेल जीवां वैराग्यांतच शांतीचें वारें!

अरसिक सारे जिकडे तिकडे जावें कोठेंही
विद्वत्तेची, सत्काव्याची कदर तयां नाहीं!

यापरि वैतागुनी एकदां पुनवेच्या रात्रीं
गृहत्याग तो करून भटके प्रवासांत यात्री!

सामर्थ्यावर असे तयाचा नितांत विश्वास
अलोट चैतन्यानें कसलें स्फुरण चढे त्यांस ?

भव्यपणा जो विश्वामध्यें उत्कट भरलेला
नयनापुढतीं आज तयाच्या काय खुला झाला ?

" गंगा–यमुना आणि हिमालय कां मज बोलावी "
भास असा होऊन तयांला मार्ग सुचे भावी !

हिंडत हिंडत शोभा पाहत तीर्थांची न्यारी
गोदाकांठीं पंचवटीला त्याची ये स्वारी !

श्रीरामाच्या वनवासानें पुनीत जी भूमी
तपोवनीं त्या उफाळल्या तत्काव्याच्या ऊर्मि !

पंचवटीहुन राजस्थानीं जयपुर ह्या गांवीं
मुशाफीर हा जरा थांबतां नशीब कां उजवी ?

राजाश्रय लाभुनी तयाचा उदो उदो झाला
स्थापुनि त्यानें उज्वल केली तिथें पाठशाला !

राजपुताना प्रांत परंतू भासुनि वैराण
इथें राहणें म्हणजे होणें जीवन हैराण !

आकर्षण तें नजरेपुढतीं उत्तर प्रांताचें
तिथें केधवां जाइन होतें ध्येय जीवनाचें !

यवनांचें साम्राज्य तेधवां उत्तर प्रांताला
धामधुमीचा काळ त्यांतुनी आला नशिबाला !


शहाजहाँ सम्राट तयाचें राज्य मुसलमानी
इस्लामी धर्माचें फडके निशाण अस्मानीं !


परकी बोली राणिपदांवर झाली आरूढ
जिकडे तिकडे वर्चस्वानें होइ तिची वाढ !

देवांची ती संस्कृत वाणी लोपुन कां जावी
बटकीची कां कळा तियेला आज बरें यावी ?

वेदांताचें–काव्यकलेचें खड्ग पाजळून
देववाणिला राज्यपदावर देइन बसवून !

करूनिया निर्धार असा तो येई दिल्लीला
शिकुनि फारशी भाषा त्वेषें योद्धा कीं सजला ?





आज ' दिवाणी-आम 'मधें कां भरला दरबार
शहाजहाँचे पुढें निवाडा कसला होणार ?

तोबा गर्दी जिकडे तिकडे श्रोत्यांची झाली
इन्साफाची उत्सुकता ती वाढुनिया गेली !

बैरागिण ती हिंदू कोणी आरोपी दिसली
गात गात जी फिरवी अपुली भिक्षेची झोळी !

पांच घरांहुन भिक्षा नाहीं जास्त कधीं घेणें
घरटीं एका--एकच गाणें--गाउनि तें फिरणें !

वैष्णव–गीतें एकतारिच्या सुरांत गातां ती
गानलुब्ध रसिकांच्या झुंडी वेडावुन जाती !

स्वर्लोकांतिल दिव्य अप्सरा गाणारिण कोणी
भूमितलांवर अवतरली जणुं गावयास गाणीं !

स्वरमालेचें विमान सोडुन उंच भरी तान
गानमाधुरी प्रत्येकांला करते बेभान !

अमीर अन् उमराव जाहले गाण्यानें वेडे
मैफलीस तिज कैसें न्यावें ? पडलें त्यां कोडें !

तिचिया इच्छेविरुद्ध अपुला साधाया स्वार्थ
दिलेरखाँ सरदार तिला ने करूनिया कैद !

त्यांस वाटलें--‘ बहाद्दुरांची खिदमत करण्याला
पैदा झाली सारी दुनिया मौज लुटायाला ! ’

जुलुमानें कां कैद करावी जो न गुन्हेगार
इच्छेविण तत्सेवा घेणें स्वार्थास्तव गैर !

शहेन्शहाँच्यापुढें तियेची चाले फिर्याद
सत्य कुणाचें त्यांवर मोठा कडाडला वाद !

वदे कुणी--' हिज बहाल झाली दैवें आवाजी
सर्व जनांचें रंजन करण्या व्हावी ती राजी ' !

करुनि बंदगी काझी गर्जे प्रौढीनें ऐसें—
" स्वरूप नाहीं लहानसें ह्या भांडण तंट्याचें !

' अमीर आणिक काफर ' यांच्यामधें लढाई ही
पक्कान्नास्तव बकरीला कुणि कापित कां नाहीं ?

अस्मानांतुन पर्जन्याचा बिंदू जो पडतो
सागरांत तो मिसळुनि अंतीं कृतार्थ ना होतो ?

भिकारिणीनें होण्यासाठीं सार्थक जन्माचें
स्वतः नको कां करावयाला जलसे गाण्याचे ?

हिची ' खुषी–नाखुषी ' न कांहीं सवाल मर्जीचा
धर्माचा हा हुकूम आणिक नियम निसर्गाचा " !

' बहोत अच्छा ' ! म्हणून सारा खुलला दरबार
तोंच गर्जना करीत कोणी धांवे झुंजार !

तळहातावर शीर घेउनी दानशूर कर्ण
वीरश्रीनें रणांत आला सोडाया बाण !

जगन्नाथ तो ! वदे--" मागतो विरुद्ध इन्साफ
काझीचें तें भाषण खोटें, त्यांत दडे पाप !"

' काफर ' कोणी त्यांस चिडवितां गर्जुनि वदला तो—
" रहेमदिलीला पायदळीं जो तुडवी ' काफर ' तो !

इन्साफाचा गळा कापतो जाणा ' काफर ' तो
धर्माज्ञेच्या विरुद्ध वर्तन करतो ' काफर ' तो !

धर्माज्ञा ती माहित नाहीं काय कुराणाची
धर्मामध्यें बळजोरी ती ना कल्याणाची !

ज्याला त्याला धर्म आपुला प्राणांहुन प्यार
धर्म रक्षण्या देवहि घेतो जगांत अवतार ! "

काझी वदला–" नसे जान त्या औरत जातीला
दुबळ्यांचें तें जीवन म्हणजे धन धनवंताला !

जगांतले हे काफर नाहिंत अल्लाचे भक्त "
वहकुनि ऐसे अखेर काझी झाला संतप्त !

उत्तरला मग जगन्नाथ कीं, " धन्य खरोखर तो
स्त्रीजातीला सद्भावें जो जगांत वागवितो !

अमीर, काफर दोघे घेती ' अल्लाचें ' नांव
भावाभावामधें, कशाचा जगीं दुजाभाव ?

एका अल्लानें निर्मियली दौलत विश्वाची
हिंदू-मुस्लिम, राव-रंक वा दुफळी कां त्यांची ?

वस्तू एकच नाना नांवें ओळखली जाते
परमेश्वर अन् अल्ला एकच ! दोन कुणी ना ते ! "

काव्यशक्तिचें–वेदांताचें भाषण ऐकून
शहाँ जहाला कविरायांवर आनंदित पूर्ण !

शिक्षा त्यानें सुनावली त्या दिलेरखानाला
' निर्दोषी हो बैरागिण ती '–न्याय असा झाला !

' कविरायानें काय हवें तें मागुनिया घ्यावें
प्रासादांमधिं भेटिस अपुल्या केव्हांही यावें ! '

पांडित्याचें जिकडे तिकडे सुस्वागत झालें
जिंकुनि दिल्ली कविरायानें निशाण फडकाविलें !





मराठी ग्रंथ [illegible] ठाणे.



हाय ! परंतू निकाल ऐकत भर दरबारांत
राण्यासोबत कोण उभी ती उत्सुक सज्जांत ?

बाजुस वरचेवरतीं सारित जाळीचा पडदा
मृगनयना ती कुणास पाही लज्जेनें कितिदां !

लावण्यानें लवथवलेली कोमलांग युवती
मदन-बाण नजरेनें सोडत कुणांवरी होती ?

विद्वत्तेचें-रसवंतीचें भाषण ऐकून
फिदा जाहली काय कमालिनी चांद विलोकून ?

भ्रमराच्या प्रेमांत गवसली किंवा कां कलिका
वृक्षाच्या आश्रयार्थ किंवा धडपडली लतिका ?

जीव स्वतःचा धोक्यामध्यें घालुनिया ज्यानें
गरीब गाइस विमुक्त केलें कर्तबगारीनें !

' जगन्नाथ ' त्या कविरायांवर मन जडुनी पार
भाव फुलांचा पुजारिणीनें गुंफियला हार !

शहाजहाँची मानसकन्या गुणी ' लवंगी ' ती
प्रीतीच्या जाळ्यांत मासळी गुरफटली अंतीं !

कमलाच्या पानांवर लिहुनी प्रेम पत्र गोड
शकुंतलेसम तिनें धाडिलें लागुनि मनिं ओढ !





प्रेम-पत्र तें वाचुन बघतां पंडितरायानें
तत्हृदयाचा सागर उसळे प्रचंड लहरीनें !

बादशहाची मानसकन्या सुंदर ती युवती
काव्यप्रेमी म्हणुनि ऐकली तयें तिची कीर्ती !

राजकुमारी मज गरिबांवर व्हावी कां लुब्ध
जात तियेची लग्नास्तव कां करील प्रतिबंध ?

बादशहाचा रुकार त्यांतुन कैसा मिळणार
मनांत त्याच्या लागुनि गेली संतत हुरहूर !

'स्वप्नामध्यें मी नाहीं ना '—भास तयां झाला
कळे न त्याला भाग्य स्वतःचें कां ये उदयाला ?

गरुड भरारी मारुनि आणी अमृतरसप्याला
कोडें पडलें, त्यास लावणें कैसा ओठाला ?

अखेर हिय्या करुनि मनाचा निश्चित जागेला
ठरल्यावेळीं प्रेयसीस तो भेटाया गेला !

रात्र चांदणी, बाग फुलांनीं होती फुललेली
जिकडे तिकडे सुवास सुटुनी शोभा नटलेली !

वाहत होता वायू ;–लहरी गोड मंद शांत
कारंजांतुन जलधारा त्या थुइथुइ उडतात !

बकुळीच्या त्या झाडाखालीं निवांत समयाला
वाट पाहते कोण बरें ती मज्नूची लैला ?

मुसमुसलेल्या तारुण्याची ज्वानी भरलेली
स्फटिकासम ती कांती अपुली चांदण्यांत उधळी !

तलम रेशमी देहावरचीं नीलम वसनें तीं
शोभा नाजुक तन्वंगीची वाढवुनी देती !

कुरंगनयना अशी लवंगी सुंदर पाहून
कलाकार तो दिपून गेला वेडा होऊन !

ईश्वरनिर्मित सौंदर्याचें पान तयें केलें
डोळ्यांचें तें फिटुनि पारणें सार्थक जणुं झालें !

नजरेला ती नजर प्रथमतः दोघांची भिडली
जिवा-जिवाचें प्रेम जडावें धुंदी ही चढली !

थरथर कांपत, लाजत, मुरडत, झांकत निज डोळे
कोसळतां ती तत्करपाशीं संमीलन घडलें !

पूर्वजन्मिची ऋणानुबंधी प्रगट जणूं झाली
दोन शरीरें प्रीतिरसाच्या वृष्टीनें न्हाली !

सार्थक झालें पुरुषार्थाचें, जीवन फुलल्याचें
काव्यसागरां कविच्या चढलें उधाण स्फूर्तीचें !





प्रेमाचें हें गुपीत त्यांचें दासींना कळलें
शहाजहाँच्या कानांवर तें पोंचुनिया गेलें !

लवंगीस मग बोलावुन तिज कुर्वाळित बोले,-
' सत्य खरें कां प्रेम तुझें कविरायांवर जडलें ? '

पित्याजवळ ती लाजुनि फेंकी दृष्टी करुणेची
मिठी मारुनी दिली मान्यता ज्वलंत प्रेमाची !

कन्येची ती स्थिती पाहुनी धन्य पिता झाला
कविरायाच्याविषयीं अनुग्रह बळावुनी गेला !

कन्येच्या प्रेमास किती पण देइल तो साद
बघावया हें, त्यांस बोलवी धाडुनि जासूद !

कविरायाची स्वारी आली प्रासादामाजीं
जिथें लवंगी मनांत घाली प्रीतीची रुंजी !

स्वागत करुनी कविरायाचें शहाजहाँ वदला,—
' काय हवें तें मागावें, मी जागृत वचनाला ! '

पंडित बोले—" राजापाशीं मागावें काय
अलोट ऐश्वर्यानें नटलें जेथें औदार्य !

अभिलाषा नच मनांत कसली धनसंपत्तीची
सांभाळावी गरिबानें ती जगामधें कैशी ?

रूपसंपदेमुळें जियेच्या लाजुनि चंद्रानें
सागरांत कीं बुडून जावें उत्कट प्रेमानें !

हास्य जिचें वा मधुर पाहुनी अमृत हो म्लान
स्वर्गामध्यें उडून जातें धरेस सोडून !

कोमलतेच्यापुढें जिच्या कीं निष्प्रभ होऊन
कमळानें आपुल्या पाकळ्या घ्याव्या मिटवून !

मानसकन्या अशी लवंगी हास्यमुखी कुमरी
लाभ तियेचा मजला व्हावा आस नसे दुसरी !

अपार सौंदर्यानें तिचिया वेडें मज केलें
प्रेम खरें मज तिनें आपुलें कधींच अर्पियलें !

नदीप्रमाणें विषयसुखाचा येतां तिज पूर
हृदयसागरीं लहरी माझ्या कां न उसळणार ?

यवनाची जरि जात तियेची तमा न मज कांहीं
प्रेम शुद्ध तें जाति-जातिला जुमानीत नाहीं !

सबाह्यांतरीं अमित सद्‌गुणी पवित्र वसते जी
यवनकन्यका गणावया ती कधीं न मी राजी !

परस्परांचें प्रेम आमुचें कधीं न ढळणार
जीवननौका संसाराची सुखांत झुलणार !

समागमानें तिचा नि माझा होइल उद्धार
सायुज्याची मुक्ती अंतीं अम्हांस मिळणार ! ”

कविरायाचे बोल शहाँच्या रुजुनी हृदयांत
निज कन्येचा हात तयाच्या देई हातांत !

दोन जिवांचें मंगल झालें धर्माचारानें
शांत निवासीं वसे जोडपें नितांत गोडीनें !





पृथ्वीवरचें नंदनवन तें सुरम्य काश्मीर
सहल काढिली शहाजहाँनें आज तिथें दूर !

बर्फाच्छादित हिमालयाचीं गिरिशिखरें उंच
अस्मानाला टक्कर द्याया लाविति कां पैज ?

सौंदर्यानें–सामर्थ्यानें–गांभीर्यानेंही
जिकडे तिकडे पर्वतराजी नटलेली राही !

सरोवराच्या कांठीं बागा फुललेल्या दिसती
गुलाब देती उधळुन नाना रंगांची कांती !

देवदारचे–अक्रोडाचे–ताल–तमालाचे
सभोंवतालीं हिरवें हिरवें समूह वृक्षांचे !

नयनमनोहर शेतामधलें तांबुस केशर तें
वाऱ्यासोबत वास सुगंधित उधळुन कां देतें ?

सुरम्य ऐशा स्थळीं रंगला शहाँसवें पूर्ण
जन्मजात तो कवी प्रियेसह सुखें विलासून !

सूर्यास्ताला सरोवराच्याकांठीं विहरावें
प्रियेस घेउन शिकाऱ्यांतही बसून मिरवावें !

धुंद होउनी अपूर्व शोभा कमळांची पाही
कमलाक्षीला आलिंगुन तो चुंबनही घेई !

उपमा आणिक उत्प्रेक्षांनीं नटलेलें दिव्य
निज पत्नीच्या सौंदर्यावर त्यांस स्फुरे काव्य !

" काळी बुबुळें सखये ! देती शोभा वदनास
मृगलांछनमय चंद्रबिंब तें दुजें गमे खास !

वदनचंद्रमा तुझा बघे तो पडे संभ्रमांत
चकोरपक्षी उगाच ना ते जिभा चाटतात ?

हास्यवदन तव सुगंधशाली पुष्प जणूं फुलतें
अवनितलावर सुगंध उधळुन प्रसन्नता देतें !

उरोज तूझे केतकरंगी चंद्र सूर्य गमती
पक्व फळें रस चेतनप्रवृत्तीचा सांठवती !

काळे कुरळे केस मोकळे सोडुनि तूं देशी
धीवरकन्ये ! जाळित मासे प्रीतीचे धरशी !



११२६९

शुकचंचूसम तुझी नासिका चांफ्याची कलिका
जों न मक्षिका त्यावर बैसे राग तुला ये कां ?

लाल ओठ ते प्राजक्ताचे नाजुकसे देठ
दांत तुझे ते डाळिंबाच्या दाण्यासम थेट !

कल्पवृक्ष मी आणि सखे तूं अमृतवल्ली ती
तिलोत्तमा, मेनका, अप्सरा दासी तुजपुढतीं !

लिंबाच्या कांतीसम यौवन त्वदीय रसरसलें
भ्रमराला मोहांत पाडतें कमल विकसलेलें !

भुवयांच्या जेधवां कमानी ओढुनि तूं घेशी
नेत्रांचे ते बाण खंजिरी मारुनि जणुं देशी !

मदन किती हा द्वाड सखे ग जगांत वावरतो
करशी तूं अपराध आणखी शिक्षा मज देतो !

देह नटविशी हिरावून तूं शोभा कुसुमांची
विकल करी मत्प्राण नव्हाळी तव तारुण्याची !

तव अधराचें चुंबन घेतां लाली जी चढते
प्रवाळ वृक्षाच्या लालीला कां ती लाजविते ?

अधराच्या अन् मृदुतेपुढती लाजुन लाजून
कोमल पानें खालीं माना देती घालून ! ”

मस्त चालतां विलास ऐसा रम्य निसर्गांत
स्फूर्ति तयाची उसळुन स्फुरलें काव्य अमर्याद !

शहाजहाँच्या पत्नीचा तो बंधु सुभेदार
रोज त्यांतुनी करी तयाचा आदरसत्कार !


गुणी असा यजमान तयांवर प्रसन्न होऊन
'असफ़्विलास' हा ग्रंथ विराचिला चरित्रसंपन्न !

सुखांत ऐशा स्मरण शहाँला बेगमचें झालें
शहाँसवें कविराय, लवंगी दिल्लीला आले !

प्रिय पत्नीच्या कबरीचें तें दर्शन घेण्याला
उत्सुकतेनें ताजमहालाकडे शहाँ गेला !

हाय ! परंतू एकाएकीं वार्ता धडधडली
आलम्‌गिरानें बंड पुकारुन भडकाविली दिल्ली !





जिकडे तिकडे पुंडावा हा दिल्लीला कसला
तक्तासाठीं घाला आतां कोणाचा पडला ?

नाकेबंदी सभोंवार ती कडेकोट झाली
शाही सरदारांच्या दारीं रखवाली बसली !

लुटालूट अन् जाळपोळ ती भरदिवसा घडली
घबराटीनें कैक जनांनीं पळापळी केली !

दिल्लीचें तें राज्य घ्यावया करून निर्धार
दीन ! दीन ! कां गर्जत आला तो आलमगीर !

आग्र्यामध्यें पंचहत्यारी सैन्य बळें घुसलें
हां हां म्हणतां शहर तयानें लुटून जिंकियलें !

शहाजहाँला कैद जहाली रोखुनिया भाले
दिल्लीवरती धाड घालण्या मोर्चे मग वळले !

दिल्लीमध्यें शहाजहाँचा सुपुत्र तो 'दारा'
युद्ध करूनी राज्य हिसकणें पाप समजणारा !

कविरायांवर जडली होती दाराची प्रीती
ज्याच्या विद्वत्तेनें त्याची बळावली नीती !

हाय ! परंतू धडगत आतां कोणाची नव्हती
दिल्लीमध्यें रहावयाची संचरली भीती !

असंतोषही वाढत गेला कविरायाविषयीं
यवनकुमारी ज्यानें वरिली जाणुनबुजुनीही !

हिंदू पंडित होते नव्हते जमले एकत्र
सभेंत प्रत्येकानें केला त्याचा धिःक्कार !

'धर्मशास्त्रपरिमाणें' यांचा सभेंत खल झाला
'कर्ममार्ग' तो उरे शेवटीं शासन देण्याला !

'त्याग करावा यवन स्त्रीचा' कोणी कुजबुजला
'घ्यावें प्रायश्चित्त आणखी' दुसरा ओरडला !

न्याय सभेचा जाहिर झाला, ठरला निर्धार
'वाळित टाकुनि त्यांवर घाला पूर्ण बहिष्कार !'


त्वेषानें पण जगन्नाथ त्या सभेस उत्तरला—
"बहिष्कार भय अहो घालतां निरर्थ कोणाला ?

मदोन्मत्त त्या गजाप्रमाणें कुणी न तो वीर
पांडित्याची नखें दाखवूं कशास मी तीव्र ?

सभेंत ह्या भरलेले दिसती जंबुक वाचाळ
सिंहाला कां कुणी यांतला करील घायाळ ?

पायदळीं मी विरोध तुमचा सारा ठोकरतों
प्रत्येकाची फोल पात्रता पुरती पारखतों !

धर्मविधीनें संमत झाला विवाह प्रीतीचा
वियोग अमुचा विषय अतां तो केवळ नियतीचा !"





कडक इषारा देउनि जाहिर सभेंत धैर्यानें
जगन्नाथ तो घरीं परतला व्याकुल हृदयानें !

' दिल्लीमध्यें बंड आणखी पित्यांस ती कैद '
दुस्सह वार्ता लवंगिला कां करी नाउमेद !

दु:खावेगें ढाळित अश्रू पतीस ती वदली—
" नाथ ! कशी हो आकाशाची कुऱ्हाड कोसळली !

छत्र पित्याचें एकाएकीं नष्ट कसें झालें
दुर्दैवाचे दुष्ट दिवस कां आतां ओढवले ?

ठाउक नाहीं तुम्हांस आहे कसा आलमगीर
' ताज ' मिळविण्या करील अपुल्या भावांना ठार !

' हिंदू तुम्ही, मुसलमान मी '—विवाह दोघांचा
रुचावयाचा तयां कसा जो कट्टर जातीचा !

यवनकन्यका गळ्यांत तुमच्या चुकून मी पडलें
प्रेम अर्पिलें तुम्हांस माझें, वेडी कां ठरलें ?

घडेल माझ्यामुळें जिवाला तुमच्या अपघात
प्रेमळ संसाराचा होइल क्षणांत निःपात ! "

" उदासवाणें बोल असें तूं नको सखे बोलूं
दुःखाश्रू ते नयनांमधुनी नको बरें ढाळूं !

टक्कर देणें प्रसंगास त्या येइल जैसा तो
घोर संकटीं देव कसोटी भक्तांची बघतो !

आजवरीचा काळ आपुला सुखामधें गेला
दुःखाचा तो तीव्र तडाखा केव्हां ना बसला !

समरस झालों परस्परांच्या जीवनांत दोघे
करावया वेगळे काळ तो घेइलही मागें !

सुखदुःखानें सजलें सारें जीवन सकलांचें
सौख्य हवें तर दिवस कंठणें कां नच दुःखाचे ?

एकाएकीं जरी आपुले ग्रह आतां फिरले
मार्गहि काढूं यांतुन आपण, धीर धरी मृदुले !

तीर्थांची ती करीत यात्रा काशीला जाऊं
गंगातीरीं पवित्र स्थानीं सुखामधें राहूं !

जगतानें जरि दूर लोटलें करून धि:कार
गंगामाता तुला नि मजला देइल आधार ! ”





अखेर सोडुन घरदारांला अंधाऱ्या रात्रीं
दिल्लीच्या बाहेर निघाले कोण दोन यात्री ?
मथुरेच्या मार्गानें धोपट करित वाटचाल
खडतर त्यांचा प्रवास चाले तीव्र होत हाल !
थंडीचा अन् कडक उन्हाचा मारा साहून
ठायीं ठायीं दिलें तयांनीं मांडुनिया ठाण !
ऐश्वर्यामधिं जन्म जिथेचा आजवरी नटला
प्रवास पायीं करावया तिज सरांव तो कुठला ?

नाजुक केळीसमान शोभे शरिराची यष्टी
सुके ' लवंगी ' चालुन चालुन होउनिया कष्टी !

प्रारब्धाचा भोग कुणांला चुकला पण जगतीं
धीर देउनी ' जगन्नाथ ' तिज चालवि सांगातीं !

सुखदु:खांची प्रवासांत त्यां झाली जाणीव
भावी आशेवरीं चालले पुढति दोन जीव !

ईप्सित त्यांचें मात्र शेवटीं सफल पूर्ण झालें
मुक्कामाला काशीक्षेत्रीं कसेंबसें आले !

गांवामध्यें गंगेजवळीं बघुनि धर्मशाळा
तिथें तयांनीं आनंदानें निवास तो केला !

कविरायाचा जीव शांततेमधें अतां रमला
धार्मिक आचरणांत तयाचा काल सुखें गेला !

उठुनि सकाळीं प्रातःकाळीं गंगेवर जावें
स्नानानंतर एकाग्रानें चिंतनस्थ व्हावें !

घ्यावें विश्वेश्वर–दर्शन मग मंदिरांत रोज
पाठीराखा सदैव राखी भक्तांची लाज !

कविरायाची जागृत झाली हृदयांतिल स्फूर्ति
फुलून प्रतिभा ग्रंथांची हो अलोट निष्पत्ति !

सर्व रसांचें मंथन झालें हृदयसागरांत
घडला आविष्कार तयांचा उत्कट काव्यांत !

प्रसाद त्याच्या काव्यामधला अमृतमय बनला
' लक्ष्मी, ' ' अमृत, ' ' सुधा ' नि 'करुणा' लहरींनीं लुटला !

हृद्य ' भामिनी-विलास ' सुंदर काव्यांनी रंगे
' प्राणा ' ' जगदाभरण ' प्रशंसा राजांची सांगे !

अलंकार-शास्त्रावरला तो असामान्य ग्रंथ
' रसगंगाधर ' रचावयाला झाली सुरवात !

काव्यसागरामधें डुंबला पुरा जगन्नाथ
गंगामाता, विश्वेश्वरच्या गोड चिंतनांत !

दैवानें पण पाठ पुरविली तिथेंहि क्षेत्रांत
घडावयाचें चुके न कोठें जें जें नशिबांत !

विश्वेश्वरचें दर्शन घ्याया जेव्हां तो आला
एकाएकीं त्याच्याविषयीं बोभाटा झाला !

दिल्लीकडले पंडित कांहीं क्षेत्रीं आलेले
लगेंच त्यांनीं त्याला तेथें पुरतें ओळखले !

ओरडले ते—" पवित्र मंदिर झालें हो भ्रष्ट
दर्शनार्थ हा पतित पातला अधमाधम दुष्ट !

काशीक्षेत्रीं खपतो कैसा हा भ्रष्टाकार
ब्रह्मजनांनो ! कोठें तुमचा विचार आचार !

धर्म बुडाला, घात जहाला, कोण तारणार
चांडाळाला शासन सांगा कसलें करणार ?

हांकुनि लावा ह्या भ्रष्टांला क्षेत्राच्या पार
पवित्रता ती इथें राखणें तुमचा अधिकार !

देवाचा तो कोप भयंकर ना तर होणार
हाल आपुले श्वान कदापी नाहीं खाणार ! "

हां हां म्हणतां ब्राह्मण, पंडे काशीचे जमले
जगन्नाथकविरायावरतीं तुटूनिया पडले !

' दीक्षित अप्पय्या ' मग पुढतीं सरसावुन आले
दांत ओंठ खाऊन तयांला रागानें वदले—!

" चोरासम राहिलास कां तूं येउनि क्षेत्रांत
संसर्गानें केलिस येथिल पवित्रता नष्ट !

पाप तुझ्या जें हातुन घडलें कधीं न लपणार
विश्वेश्वर तो न्यायी आहे शासन करणार !

क्षेत्रांमधुनी होइं चालतां सत्वर येथून
धर्माचा अधिकारी हा तुज देतो फर्मान !

सूज्ञांला तें अधिक सांगणें लागतही नाहीं
ज्याची त्यानें हवी योग्यता जाणाया कांहीं !"

" कोण मला ही करीत आज्ञा तें मी ओळखतों
' मीमांसा ' तूं लिहिली त्याची किंमतही करतों !
ग्रंथानें तव साहित्याला गालबोट लागे
खंडन त्याचें करावयाला सरणार न मागें !

अहंकार शकतो न योग्यता ठरवूं कोणाची
महाकाल तो ठरविल माझी,—तुझी नि सर्वांची !


काशिनाथ तो आहे सगळ्या विश्वाचा नाथ
मला दार कां होइल त्याचें बंद दर्शनार्थ ?
विटाळ होतो देवाला ना कसला कोणाचा
क्षुद्र तुम्ही ते मानव करितां विचार जातीचा !"


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

उत्तरला हें, जगन्नाथ पण ऐकेना कोणी
जो तो गेला अंगावरतीं त्याच्या धांवोनी !

धक्के देउन दूर लोटले तयांस तेथून
अहेर धोंडे, पादत्राणें यांचा होऊन !

सहन करित हें मनांत बोले जातां जातांना–
“ विश्वनाथ हे ! तूंही आश्रय देऊं शकसी ना ? ”





" चोंहिकडूनी जांच असा जर जिवां जाळणार
कशास ऐशा जगीं जगावें होउनिया भार ?

मानव येथें मानवांस कां वाळिमधें टाकी
देवाच्या दर्शनार्थ बंदी कां ती इहलोकीं ?

पतितांना कां कुणी न उरला द्याया आधार
होइल त्यांचा जगामधें तो कैसा उद्धार ?

जातीजातींमधें माजला कलह बेसुमार
स्वार्थ साधुनी भाग्य कुणाचें जगीं उजळणार ? ”

विचारचक्रें मनांत ऐशीं गेलीं फिरकून
निराधार तो घरीं परतला हताश होऊन !

ब्रह्मजनांनी केलेला छळ तयांस जाणवला
अवस्थेंत त्या चवताळुन तो सिंहासम उठला !

‘ मीमांसेचें ’ खंडन केलें लचके तोडून
‘ अप्पय्यांच्या ’ दिलें मुखाला काजळ फासून !

‘ भट्टोजींची ’ ‘मनोरमा’ ती मनांत ना भरली
‘ मनोरमा–कुचमर्दन ’ त्यांवर टीका पाजळली !

‘ रसगंगाधर ’ पुरा न झाला अवधीनें अल्प
जीवन अपुरें तिथें कशाचा उरला संकल्प ?


नको नको तें जगणें आतां जगीं निराधार
पत्नीसह तो कुठें निघाला करून निर्धार !

गंगातीरावरीं उभयतां त्रस्त मनें आले
गंगामातेवांचुन आतां कोण तयां उरले ?

विरक्त वृत्ती होउन हृदयें गंगामय बनली
घांटावरतीं आणि उभयतां तपांस तीं बसलीं !

जेष्ठाचा तो पवित्र महिना सुरू दशाहारा
उत्सव गंगेचा त्यावेळीं अपूर्व दिसणारा !

मांगल्याचें करीत होता वायू वरदान
गंगास्तोत्रानें दुमदुमलें जमीन अस्मान !



गंगेचें तें प्रचंड पाणी अखंड वेगांत
खळाळुनी कां चढत चाललें उसळ्या मारीत ?

गंगेचें तें चढतें पाणी बघुनि जगन्नाथ
गंगामाइस नमस्कारुनी नाचे हृदयांत !

हृदयामधली स्फूर्ती आली खास उचंबळुन
'गंगालहरी' सुरू जाहल्या आणि मुखांतून- !

" आई आली माझ्या जवळीं ये ग ये आई
जगन्नाथ हा बालक तूझा अंकावर घेई !

सर्व जगानें धिःकारूनी टाकियलें मजला
आश्रय आतां तुझा माउली वत्साला उरला !

आजवरीं मी स्तुती गाइली राजांचीं रुक्ष
धनलोभानें तुझ्याकडे मी केलें दुर्लक्ष !

निर्बुद्धाला आई आतां लोटुं नको दूर
मातेच्या ह्रदयांत वाहतो प्रीतीचा पूर !

पापी आहे कुपुत्र तूझा अनाथ झालेला
इहपरलोकीं तयां न सद्गति सदा तहानेला !

सुधामयी तूं सद्गति देशी स्नेहें द्रवलेलीं
शरणागत मी, रक्षण माझें कर तूं ह्यावेळीं !

दान, ध्यान, तप, यज्ञ करूनी मिळे न जें कोणां
विष्णूचें पद समदृष्टीनें देशी सकलांना !

धर्ममध्यें प्रायश्चित्त न कोठें पतितांना
देवाकडुनी संरक्षण वा कसलें ना त्यांना !

नरकामधल्या अशा जनांना खास तारण्यासी
अमरत्वाची दिव्य औषधी आई ! तूं गमसी !

सगर-सुतांचा तव उदकानें दिव्य देह झाला
स्वर्लोकीं ते अजून गाती तुझ्या थोरवीला !

श्रीविष्णूच्या चरणनखांतुन उगम तुझा झाला
सदाशिवाच्या जटेमधें तूं निवासही केला !

पतितोद्धारासाठीं चाले त्वदीय सलिलौघ
तुझिया उत्कर्षाची आहे जगांस ती जाग !

मनांत तूझ्या राहुन इच्छा असेल गेलेली
करावया उद्धार अशी मज व्यक्ति न आढळली !

सफल कराया ती मी आलों पापी, हतवीर्य
उद्धरतां मज, सर्व जगां तें गमेल आश्चर्य !

तुझिया नामस्मरणें मजला मिळेल ती शांती
मधुर तुझें तें नांव मुखांतुन विलसो प्राणांतीं !”

‘गंगालहरी’ एका मागुन एक अशा स्फुरती
चढत चाललें पाणी तैसें गंगेचें वरतीं !



गंगाजल तें वीरेश्वरच्या घांटाला भिडलं
श्लोकागणती एक पायरी उंच असें चढलें !

बावन्नावा श्लोक जेधवां पूर्णपणें झाला
गंगाजल तें चढून भिडलें पंडितचरणांला !

प्रगट जहाली पवित्र गंगामाता साक्षात
जगन्नाथ तिज प्रेमें विनवी जोडुनिया हात— !

" आई ! येशी मोक्ष द्यावया घेउनि अवतार
पत्नी माझी यवनस्त्री कर तिचाहि उद्धार !

भक्तजनांच्या बघुनि वेदना श्रीशंकर द्रवतो
दया मनांतिल तुझियारूपें ओसंडुनि देतो !

आई ! आतां अंकावरतीं आम्हांला घेई
अंगाईचें गीत गाउनी झोंप सुखें देई !

स्वर्गंगे ! तुज ' विश्वोद्धारक ' सार्थ मिळे मान
कोण आमुचें तुझ्यावांचुनी करील कल्याण ?

मोह कशाचा जगांत आतां उरला गे नाहीं
मोक्ष-मार्ग तो दाखिव अंतिम आस नसे कांहीं !

अंत पाहसी कितीक आतां भक्ताचा आई
पवित्र उदकामधें तुझ्या नित उदारता वाही !

महन्मंगले ! तुझियाठायीं भरली शिवशक्ती
जय गंगे हे ! हर गंगे हे ! सत्वर दे मुक्ती ! "

गंगामाता दोघांवरती प्रसन्नमय झाली
स्कंधावरतीं अपुल्या त्यांना घेउनिया गेली !

चमत्कार साश्चर्य पाहती लोक नदीकांठीं
देवांनींही तशीच केली आभाळीं दाटी !

कविच्या प्रतिभासामर्थ्यानें दिपुनि सर्व गेले
कविरायाच्या पावनतेनें स्तिमित सर्व झाले !

' गंगालहरी ' प्रत्येकाच्या भरल्या हृदयांत
कविरायाला जो तो देई थोर धन्यवाद !

आत्मसमर्पण दिव्य तयाचें जागीं ज्या घडलें
तिथें तयाच्या चरितावर हें काव्य असें स्फुरलें !

भाव-फुलांची ओंजळ मोठ्या भक्तीनें भरतों
' जगन्नाथकवि-जयजयकारें ' गंगार्पण करतों !!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ११२६९



रचनाकाल:—१ ऑगस्ट १९६० ते १५ ऑगस्ट १९६०



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

परिशिष्ट

# पंडितराज जगन्नाथ यांचे समग्र ग्रंथ

(१) **सुधालहरी**—तीस श्लोकांचें काव्य. यांत श्रीसूर्यनारायणाचा महिमा वर्णन केला आहे.

(२) **अमृतलहरी**—छोटेखानी अकरा श्लोकांचें काव्य. यांत श्रीयमुनेची प्रेमळ स्तुति केली आहे.

(३) **करुणालहरी**—पंचावन्न श्लोकांचें काव्य. यांत श्रीविष्णूची स्तुति केली आहे.

(४) **लक्ष्मीलहरी**—एकेचाळीस श्लोकांचें काव्य. यांत श्रीविष्णूची पत्नी लक्ष्मी हिची स्तुति केली आहे.

(५) **गंगालहरी**—(पीयूषलहरी) बावन्न श्लोकांचे गंगेच्या स्तुतीनें भरलेलें भक्तिरसपूर्ण काव्य.

(६) **रसगंगाधर**—अलंकार शास्त्राचें विवेचन करणारा ग्रंथ. (अपूर्ण)

(७) **मनोरमाकुचमर्दन**—भट्टोजी दीक्षितांच्या 'मनोरमा' या व्याकरण विषयक ग्रंथाचें खंडन.

(८) **चित्रमीमांसाखंडन**—अप्पय्या दीक्षितकृत 'चित्रमीमांसा' ह्या अलंकार ग्रंथांतील मुद्यांचें खंडन.

(९) **भामिनीविलास**—प्रास्ताविक, शृंगार, करुण व शांत अशा चा विलासांतील स्फुट काव्यांचा संग्रह.

(१०) **आसफविलास**—नबाब आसफखानाचें चरित्र वर्णन. ( गद्यकाव्य )

(११) **जगदाभरण**—या काव्यांत शहाजहानचा मुलगा दाराशुको याची प्रशंसा केली आहे. कोणाच्या मतें यांत उदेपूरचा राणा जो कलिकर्ण त्याचा मुलगा जगत्सिंह याची स्तुति केली आहे.

(१२) **प्राणाभरण**—आसामचा राजा प्राणनारायण त्यांस उद्देशून लिहिलेलें त्रेपन्न श्लोकांचें स्तुतिपर काव्य. ( प्राणाभरण व जगदाभरण हीं दोन्ही काव्यें बहुतेक सारखींच आहेत.

(१३) **यमुनावर्णन**—यमुनेच्या स्तुतिपर गद्यपद्यात्मक ग्रंथ. ( हा ग्रंथ फारसा कोठें आढळत नाहीं. )

(१४) **अश्वघाटी**—सव्वीस श्लोकांचें मनोहर लघुकाव्य अश्वघाटी वृत्तांत रचलें आहे. या काव्यांत अनेक देवतांची स्तुति केली आहे.

(१५) **पंडितराजशतक** **व** (१६) **शशिसेना** — हे दोन ग्रंथ पंडितराज जगन्नाथाच्या नांवावर आहेत. तथापि त्यांचें कर्तृत्व कोणाकडे जातें याबद्दल अधिक माहिती मिळत नाहीं.

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......... दि. .........
क्रमांक ......... दि. .........

# संदर्भ ग्रंथ

ज्ञानकोश; भरतखंडाचा अर्वाचीन कोश; सुलभ विश्वकोश.
रसगंगाधर (काव्यमाला).
भामिनीविलास (काव्यमाला).
पंडित जगन्नाथराय यांचें चरित्र आणि गंगालहरी
ले० रा. मा. भांबुरकर.

भामिनीविलास—कै. शि. म. परांजपे.
सार्थ भामिनीविलास—दत्तात्रय अनंत आपटे.
महाराष्ट्र छाया—लक्ष्मणशास्त्री लेले.
संगीत गंगालहरी—रा. मा. भांबुरकर.
गंगालहरी—(सुश्लोक अनुवाद) वामन पंडित.
गंगालहरी (मराठी अनुवाद) श्री. रा. का. ओक.
गंगालहरी ( " ) श्री. ल. गो. विंझे.
गंगालहरी—दत्तात्रेय गोविंद पाध्ये, B. A.
जगन्नाथ पंडित (ऐतिहासिक कादंबरी)
लेखक—गो. नी. दांडेकर.
प्रस्तावना—पं. महादेवशास्त्री जोशी.
संगीत तोड ही माळ अर्थात् संगीत गंगालहरी (नाटक).
लेखक—दिवाकर कृष्ण.
Complete Poetical works of Panditraja Jagannatha
—डॉ. आर्येन्द्रशर्मसंपादित.

'भामिनीविलास'
by Vidya–Sudhakara Har Dutt Sharma
M. A., Ph.d.

* * *

REFBK-0011261
REFBK-0011261